# MEDICOVER HOSPITALS SANGAMNER

NABH ACCREDITED – PATIENT SAFETY & QUALITY OF CARE

## Best Multi-Speciality Hospital in Sangamner - Expert Care

At Medicover Hospital, Sangamner, your health is our priority. With a team of skilled doctors and dedicated healthcare professionals, supported by advanced medical technology and modern infrastructure, we ensure timely, accurate and compassionate treatment for every patient.

On National Doctors' Day, Medicover Hospitals salutes the dedication,



## Happy National Doctor's Day

- CARDIOLOGY
- ORTHOPEDICS
- GENERAL SURGERY
- INTERNAL MEDICINE
- UROLOGY
- GYNECOLOGY
- NEPHROLOGY
- NEUROSURGERY
- PAEDIATRICS
- RADIOLOGY
- PHYSIOTHERAPY
- PATHOLOGY




**संपर्क : 8956495979 | 8956495970 | 02425-229600 | 9921599215**

MEDICOVER HOSPITALS SANGAMNER

# मेडीकव्हर हॉस्पिटल्स

## गुंजाळवाडी, संगमनेर

संपर्क : 02425-229600 | 9921599215

PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH ACCREDITED

**आता कोणत्याही प्रकारच्या आपात्कालीन स्थितीसाठी आम्ही सज्ज आहोत...**
**योग्य वेळी योग्य काळजी आपले अमुल्य जीवन वाचवू शकते...**

## पुर्णवेळ तज्ञ डॉक्टरांची टीम



**डॉ. उदयकुमार बढे**
MBBS, MS, Dr DNB Neurosurgery
Consultant Neuro and Spine Surgeon



**डॉ. निखिल रहांगडाले**
MBBS D. Ortho, DNB
Consultant Orthopaedic & Joint Replacement Surgeon



**डॉ. अमित सुर्वे**
MBBS, MS (Ortho)
Consultant Orthopaedic & Joint Replacement Surgeon



**डॉ. गौरव वर्मा**
MBBS, MD (Internal Medicine)
DNB (Internal Medicine)
DM (Cardiology)
Sr. Consultant Interventional Cardiologist



**डॉ. राहुल गुट्टे**
MBBS, MD (Medicine)
DM (Cardiology)
Consultant Interventional Cardiologist



**डॉ. अमेय इथापे**
MBBS MD DM (Cardiology)
Consultant Interventional Cardiologist



**डॉ. अभिजित कोरडे**
MBBS, MD, DNB (Cardiology) FSCAI (USA)
Consultant Interventional Cardiologist



**डॉ. अशिष बाविस्कर**
MBBS, MS (General Surgery)
MCh (CVTS), DNB (C.Th)
MNAMS (C.Th)
Consultant Cardio Vascular Thoracic Surgeon & Minimal Invasive Cardiac Surgeon



**डॉ. जगदिश वाबळे**
MBBS, MD (Medicine)
Consultant General and Critical Care Physician



**डॉ. दिग्विजय शिंदे**
MBBS, MD (Medicine)
Consultant General & Critical Care Physician



**डॉ. पंकज नंदागवळी**
MBBS, MS (General Surgery)
Consultant General and Lap. Surgeon



**डॉ. योगेश तोरकडी**
MBBS, MS, MCh (Urology)
Consultant Urologist, Andrologist
Laser and Urethral Reconstructive Surgeon



**डॉ. अतुल पवार**
MBBS, MS, MCh (Urosurgery)
Consultant Urologist, Andrologist. Laser & Urethral Reconstructive Surgeon




**डॉ. सागर कोटकर**
MBBS, DGO, DNB (Obs & Gyn)
Consultant Gynecologist & Obstetrician



**डॉ. स्नेहल जगताप**
MBBS, MD Pediatrics
Consultant Pediatrics and Neonatologist



**डॉ. अमित राऊत**
DNB (Paed-Surgeon)
DEBPS (Paed-Surg. Europe)
F.Robotic Surg. FIAGES, FMAS



**डॉ. सागर हासे**
MBBS, MD (Medicine)
DM Nephrology
Consultant Nephrologist



**डॉ. काजल दरंदले**
MBBS, MD, DNB (Nephrology)
Consultant Nephrologist



**डॉ. प्रविण कोकाटे**
BDS
Consultant Dental Surgeon and Implantologist




**डॉ. चंद्रकांत तांबे**
BDS, MDS (Maxillofacial Surgery)
Consultant Dental Surgeon and Maxilofacial Surgeon



**डॉ. अमोल शिंदे**
MBBS, DNB-General Medicine, DNB (Medical Gastroenterology)
Consultant - Medical. Gastroenterology & Liver transplant Physician



**डॉ.ताहिर मो.खान**
MBBS, MS, ENT
Consultant ENT Surgeon



**डॉ. सचिन यादव**
MBBS, DA
Consultant Anaesthesiologist



**डॉ. सानिका सुर्यवंशी**
MBBS, MD (Radiology)
Consultant Radiologist



**डॉ. वैशाली रसाळ**
MBBS, DCP
Consultant Pathologist



**डॉ. पायल रंगरेज**
BPTH, CIASTMP, CRTP, CDCP
Consutant Physiotherapist



**डॉ. उत्कर्षा सोमाणी**
PG Diploma in Dietetics
Consultant Dietician



**कार्डियाक इर्मजन्सी, मेडिकल इर्मजन्सी, रोड ॲक्सीडेंट, सर्जिकल इर्मजन्सी, हेड इंजुरी व पॉली ट्रामा हाताळण्यात सक्षम**

## 30+ DOCTORS | 21 SPECIALIST DOCTORS | 24/7 SERVICES

**११० बेडस् प्रमुख पायाभूत सुविधा असलेले हॉस्पिटल एकमेव NABH मान्यता प्राप्त हॉस्पिटल**

**सर्व विमा कंपन्यांचे कॅशलेस मेडिक्लेम सुविधा उपलब्ध...**

## मोफत शस्त्रक्रिया

PM-JAY MJPJAY महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना EX-SERVICEMEN CONTRIBUTORY HEALTH SCHEME ECHS

## या आरोग्य योजनांतर्गत

ॲंजिओप्लास्टी, पेसमेकर, हृदयातील छिद्र, हाडांचे फ्रॅक्चर, मणक्याच्या शस्त्रक्रिया, मुतखडा व प्रोस्टेट ग्रंथी शस्त्रक्रिया, बालरोग शस्त्रक्रिया, गर्भाशयाला टाका व गाठी, अंडाशयातील गाठी, ट्युब ब्लॉक व हिस्टेरोस्कोपी तसेच ओपन हार्ट सर्जरी (बायपास), वॉल्व्ह रिप्लेसमेंट

# सेवाभाव, आधुनिक तंत्रज्ञान आणि विश्वासाचे प्रतीक - मेडिकव्हर हॉस्पिटल्स




प्रत्येक समाजाच्या प्रगतीचा पाया हा सुदृढ आरोग्यावर अवलंबून असतो. मानवी जीवनातील सर्वांत कठीण प्रसंगांमध्ये डॉक्टर हे आशेचा किरण ठरतात. रुग्णांच्या वेदना कमी करून त्यांना नवजीवन देण्याचे पवित्र कार्य डॉक्टर सातत्याने करत असतात. याच सेवाभावी वृत्तीचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी १ जुलै हा दिवस देशभर राष्ट्रीय डॉक्टर्स दिन म्हणून साजरा केला जातो. भारतातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ, माजी मुख्यमंत्री आणि भारतरत्न डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस पाळला जातो. डॉक्टर, परिचारिका आणि संपूर्ण आरोग्यसेवा यंत्रणा समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी अहोरात्र कार्यरत असते. कोविड-१९ महामारीच्या काळात तर डॉक्टरांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून लाखो रुग्णांचे प्राण वाचविले. त्यामुळे डॉक्टरांविषयीचा आदर आणि विश्वास अधिक दृढ झाला आहे.

याच सेवाभाव, आधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीमुळे मेडिकव्हर हॉस्पिटल्सने देश-विदेशात आरोग्यसेवेच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज मेडिकव्हर हे नाव गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेचे प्रतीक बनले आहे.

मेडिकव्हरचा जागतिक प्रवास हा अत्यंत प्रेरणादायी आहे. मेडिकव्हर समूह हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आरोग्यसेवा आणि निदान सेवा पुरविणारा अग्रगण्य समूह म्हणून ओळखला जातो. युरोपमध्ये सुरू झालेल्या या समूहाने अल्पावधीतच जागतिक स्तरावर विस्तार साधला. आज मेडिकव्हर १८ हून अधिक देशांमध्ये आरोग्यसेवा पुरवत असून लाखो रुग्णांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी ठरला आहे. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर, उच्च दर्जाच्या सुविधा आणि रुग्णांना केंद्रस्थानी ठेवून केले जाणारे उपचार हे मेडिकव्हरच्या यशामागील प्रमुख घटक आहेत.

भारतामध्ये मेडिकव्हरने आधुनिक, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे ध्येय स्वीकारले आहे. देशातील विविध राज्यांमध्ये मेडिकव्हरची बहुविशेषज्ञता असलेली रुग्णालये कार्यरत असून आधुनिक उपचारपद्धती, अत्याधुनिक उपकरणे आणि अनुभवी डॉक्टरांच्या माध्यमातून लाखो रुग्णांना सेवा दिली जात आहे. देशभरातील २६ हून अधिक रुग्णालये, सुमारे सहा हजारांहून अधिक खाटा, हजाराहून अधिक तज्ज्ञ डॉक्टर आणि अत्याधुनिक आयसीयू सुविधांमुळे मेडिकव्हरने आरोग्यसेवेचे मजबूत जाळे उभारले आहे.

महाराष्ट्रातही मेडिकव्हर हॉस्पिटल्सने प्रभावी उपस्थिती निर्माण केली आहे. नवी मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि संगमनेर या ठिकाणी मेडिकव्हरची रुग्णालये कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा, सुपर स्पेशालिटी विभाग, तज्ज्ञ डॉक्टर आणि रुग्णकेंद्रित सेवा उपलब्ध आहेत. उत्तर महाराष्ट्रापासून ते महानगरांपर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य मेडिकव्हर सातत्याने करत आहे.

उत्तर महाराष्ट्रातील आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर हे एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास आले आहे. संगमनेर आणि परिसरातील नागरिकांना महानगरांप्रमाणेच अत्याधुनिक आरोग्यसेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे रुग्णालय कार्यरत आहे. आज संगमनेर, अकोले, राहुरी, कोपरगाव, श्रीरामपूर, इगतपुरी तसेच ग्रामीण भागातील हजारो रुग्णांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल हे विश्वासाचे ठिकाण बनले आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर हे बहुविशेषज्ञता असलेले अत्याधुनिक रुग्णालय असून येथे सुमारे २२० खाटा, ४० अतिदक्षता




खाटा, आधुनिक कॅथलॅब, प्रगत ऑपरेशन थिएटर, अत्याधुनिक रेडिओलॉजी विभाग, २४ तास कार्यरत आपत्कालीन सेवा, ट्रॉमा केअर सेंटर, फार्मसी, ॲम्ब्युलन्स सेवा आणि अत्याधुनिक निदान सुविधा उपलब्ध आहेत. अत्यावश्यक प्रसंगी तातडीची आणि अचूक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याची क्षमता या रुग्णालयाने सिद्ध केली आहे.

हृदयरोग उपचाराच्या क्षेत्रात मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरने विशेष स्थान निर्माण केले आहे. अनुभवी कार्डिओलॉजिस्ट, अत्याधुनिक कॅथलॅब आणि हृदयविकारावरील प्रगत उपचारपद्धती यांच्या साहाय्याने हृदयविकारग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक उपचार दिले जातात. त्याचबरोबर ऑर्थोपेडिक्स विभागात सांधे प्रत्यारोपण, फ्रॅक्चर व्यवस्थापन, कणा विकार उपचार आणि विविध शस्त्रक्रिया केल्या जातात.

न्यूरोलॉजी आणि न्यूरोसर्जरी विभागामध्ये मेंदू व मज्जासंस्थेशी संबंधित आजारांवर तज्ज्ञ उपचार केले जातात. युरोलॉजी विभागामध्ये मूत्रविकार, मूत्रपिंड विकार, लेझर शस्त्रक्रिया आणि प्रगत युरोलॉजिकल उपचार सुविधा उपलब्ध आहेत. जनरल सर्जरी, स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र, बालरोग, नेफ्रोलॉजी, रेडिओलॉजी, फिजिओथेरपी आणि पॅथॉलॉजी या विभागांमधूनही रुग्णांना दर्जेदार सेवा दिली जाते.

मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे कार्यरत असलेले तज्ज्ञ डॉक्टर हे या रुग्णालयाची सर्वात मोठी ताकद आहे. विविध शाखांतील अनुभवी तज्ज्ञ, कुशल शल्यचिकित्सक, समर्पित परिचारिका आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे रुग्णांना सुरक्षित, अचूक आणि प्रभावी उपचार मिळतात. रुग्णांशी संवेदनशीलतेने संवाद साधणे, उपचारांविषयी योग्य मार्गदर्शन करणे आणि संपूर्ण उपचार प्रक्रियेत कुटुंबीयांना विश्वासात घेणे ही या रुग्णालयाची वैशिष्ट्ये आहेत.

रुग्णकेंद्रित सेवा हा मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या कार्याचा मूलमंत्र आहे. प्रत्येक रुग्ण हा कुटुंबातील सदस्य असल्याप्रमाणे त्याची काळजी घेतली जाते. आधुनिक तंत्रज्ञानासोबत मानवी स्पर्शाची जोड दिल्यामुळे रुग्णांना मानसिक आधार मिळतो. २४ तास आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, अचूक निदान सुविधा आणि सतत उपलब्ध वैद्यकीय पथक यामुळे गंभीर परिस्थितीतही रुग्णांना त्वरित उपचार मिळू शकतात. तसेच विविध आरोग्य विमा आणि कॅशलेस सुविधांमुळे रुग्णांना आर्थिकदृष्ट्याही दिलासा मिळतो.

आजच्या वेगवान जीवनशैलीत वाढते हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, उच्च रक्तदाब आणि इतर जीवनशैलीजन्य आजार लक्षात घेता प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीचे महत्त्व वाढले आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल्स विविध आरोग्य तपासणी पॅकेजेसच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर निदान आणि उपचाराची संधी उपलब्ध करून देत आहे. आरोग्य जनजागृती, आरोग्य शिबिरे आणि सामाजिक बांधिलकी जपत मेडिकव्हर समाजसेवेचे कार्यही सातत्याने करत आहे.

राष्ट्रीय डॉक्टर्स दिन हा केवळ डॉक्टरांचा गौरव करण्याचा दिवस नाही, तर समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या प्रत्येक वैद्यकीय कर्मचाऱ्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथील सर्व तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी यांना मनःपूर्वक सलाम. त्यांच्या सेवाभाव, समर्पण आणि रुग्णांप्रती असलेल्या बांधिलकीमुळेच हजारो कुटुंबांच्या चेहऱ्यावर आज आरोग्यपूर्ण हास्य फुलत आहे. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेने कार्य करणाऱ्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचा प्रवास भविष्यातही समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी प्रेरणादायी ठरत राहील,

## आरोग्यदायी जीवनाची सुरुवात जागरूकतेपासून



निरोगी आरोग्य ही जीवनातील सर्वात मोठी संपत्ती आहे. मात्र, अनेकदा आजार गंभीर झाल्यानंतरच लोक वैद्यकीय उपचारांचा आधार घेतात. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये, आमचे ध्येय केवळ आजारांवर उपचार करणे एवढेच मर्यादित नाही. जनजागृती निर्माण करणे, निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि आरोग्य शिक्षण व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी सक्षम करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, लठ्ठपणा तसेच तणावाशी संबंधित आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मात्र, नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, तणावाचे योग्य व्यवस्थापन तसेच तंबाखू आणि मद्यपानापासून दूर राहणे या सवयी अंगीकारल्यास या आजारांवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येते आणि अनेक आजार टाळता येऊ शकतात.

प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा ही निरोगी भविष्यासाठी भक्कम पाया आहे. नियमित आरोग्य तपासण्यांमुळे अनेक आजार सुरुवातीच्या टप्प्यातच निदान होतात. त्यामुळे उपचार अधिक प्रभावी, कमी गुंतागुंतीचे आणि परवडणारे ठरतात. प्रत्येकाने आपल्या वैद्यकीय इतिहास, जीवनशैली आणि जोखमीच्या घटकांचा विचार करून नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये, आम्ही करुणामय, नैतिक आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत. अनुभवी डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्यसेवा तज्ज्ञांची आमची समर्पित टीम आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रत्येक रुग्णाला सुरक्षित, विश्वासार्ह आणि उच्च दर्जाची उपचार सेवा मिळावी यासाठी सातत्याने कार्यरत आहे. उत्कृष्ट वैद्यकीय सेवेद्वारे प्रत्येक रुग्णाचा आरोग्य अनुभव अधिक समाधानकारक करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

आमचा ठाम विश्वास आहे की, आरोग्य ही केवळ रुग्णालयाची जबाबदारी नसून प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज आणि आरोग्यसेवा देणारे सर्व घटक यांची सामूहिक जबाबदारी आहे. निरोगी सवयींचा स्वीकार, आजारांबाबत जागरूकता आणि वेळेवर उपचार यांद्वारे आपण अधिक सुदृढ समाजाची निर्मिती करू शकतो.

चला, उपचाराइतकेच प्रतिबंधालाही महत्त्व देणारे भविष्य घडवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊया. जनजागृती, वेळेवर निदान आणि योग्य वैद्यकीय उपचार यांच्या माध्यमातून आपण अधिक निरोगी समाज घडवू शकतो आणि प्रत्येकाचे जीवन अधिक सुरक्षित, आनंदी व गुणवत्तापूर्ण बनवू शकतो.

जागरूक राहा निरोगी राहा सुरक्षित राहा



**- डॉ. स्नेहल गायके**
केंद्र प्रमुख (Centre Head)
मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर

## डॉक्टर आणि समाज यांच्यातील विश्वासाचा दुवा – आमची बांधिलकी

आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत गरज आहे. मात्र आजही ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना योग्य उपचार कुठे मिळतील, कोणते तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत किंवा शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ कसा घ्यावा, याची पुरेशी माहिती नसते. ही माहिती समाजापर्यंत पोहोचवणे आणि डॉक्टर, रुग्ण व रुग्णालय यांच्यात विश्वासाचा मजबूत दुवा निर्माण करणे, हेच आमच्या टीमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने आम्ही दररोज शहरांपासून ते अगदी दुर्गम गावांपर्यंत पोहोचत आहोत. आमची टीम सुमारे दोन ते अडीच हजार डॉक्टरांशी सातत्याने संपर्क ठेवते. त्यांना मेडिकव्हर हॉस्पिटलमधील अत्याधुनिक सुविधा, उपलब्ध सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर, नवीन उपचारपद्धती आणि रुग्णांना मिळणाऱ्या सेवांची सविस्तर माहिती दिली जाते. यामुळे गरजू रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचारासाठी योग्य ठिकाणी मार्गदर्शन मिळते.

फक्त डॉक्टरांपर्यंतच नव्हे, तर ग्रामपंचायत, बचत गट, सामाजिक संस्था आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने आम्ही विविध ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करतो. या शिबिरांमधून नागरिकांची आरोग्य तपासणी केली जाते, आजारांचे लवकर निदान होते आणि आरोग्याविषयी जनजागृती केली जाते. अनेक वेळा या शिबिरांमुळे गंभीर आजार सुरुवातीच्या टप्प्यातच निदर्शनास येतात आणि रुग्णांचे आयुष्य वाचवण्यास मदत होते.



आजही अनेक रुग्णांना हृदयरोग, हाडांचे आजार, मूत्रविकार किंवा इतर गंभीर आजारांसाठी कोणत्या तज्ज्ञाकडे जावे, याची माहिती नसते. तसेच आर्थिक अडचणींमुळे उपचार टाळले जातात. अशा वेळी आम्ही आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY), मुख्यमंत्री सहायता निधी (CM Relief Fund) आणि इतर विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवतो. योग्य मार्गदर्शनामुळे अनेक रुग्णांना कमी खर्चात किंवा विनामूल्य उपचार मिळण्याचा मार्ग खुला होतो.

डॉक्टर्स डे हा केवळ डॉक्टरांचा गौरव करण्याचा दिवस नाही, तर समाजाच्या आरोग्यासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या प्रत्येक डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि आरोग्य जनजागृती करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या कार्याचा सन्मान करण्याचा दिवस आहे. डॉक्टरांचे ज्ञान, सेवा आणि संवेदनशीलता यांना समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याची जबाबदारी आम्ही मनापासून पार पाडत आहोत.

आमचा विश्वास एकच आहे - योग्य माहिती, योग्य मार्गदर्शन आणि योग्य वेळी उपचार मिळाले, तर अनेकांचे जीवन वाचू शकते. आरोग्याविषयी जागरूक समाज घडवणे आणि प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवणे, हीच आमची खरी बांधिलकी आहे. डॉक्टर्स डेच्या निमित्ताने सर्व डॉक्टरांना मनःपूर्वक शुभेच्छा! समाजसेवेच्या या पवित्र कार्यात आपण सर्वजण मिळून निरोगी भारत घडवूया.

**- दीपक जाधव**
हेड मार्केटिंग
मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर

**पुरवणी संकलन - सुहास सातपुते - ८३८०९५६६०४**

# मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर सर्व विमा कंपन्यांचे कॅशलेस मेडिक्लेम सुविधा

**TPA**

- Paramount Health Services & Insurance TPA Pvt. Ltd.
- Family Health Plan (TPA) Limited
- MD India Health Insurance TPA Pvt Ltd.,
- Medi Assist India TPA Pvt. Ltd.
- Heritage Health Insurance TPA Pvt. Ltd.
- Genins India Insurance TPA Ltd
- Health Insurance TPA of India Ltd
- Health India Insurance TPA Services Pvt. Ltd.
- Care Health Insurance
- Vidal Health TPA Pvt Ltd.
- Medsave Health Insurance TPA
- Oriental Insurance Company Ltd.,



Your Family
Our Responsibility

**INSURANCE**

- Star Health & Allied Insurance Co. Ltd.,
- United India Insurance Co. Ltd.,
- National Insurance Co. Ltd.,
- ICICI Lombard General Insurance Company Limited
- Bajaj Allianz Health Insurance Co., Ltd.,
- IFFCO-Tokio General Insurance Co. Ltd.
- Future Generali General Insurance Company in India
- Acko General Insurance
- Aditya Birla Health Insurance Co. Ltd
- Max Bupa Health Insurance Co. Ltd.,
- The New India Assurance Company

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) अंतर्गत

* अँजिओप्लास्टी, पेसमेकर
* हृदयातील छिद्र
* मुतखडा व प्रोस्टेट ग्रंथी शस्त्रक्रिया
* वॉल्व्ह रिप्लेसमेंट
* हाडांचे फ्रॅक्चर
* ओपन हार्ट सर्जरी (बायपास)

**मोफत केल्या जातात**

* नियम व अटी लागू

## ११० बेडस् आणि प्रमुख पायाभूत सुविधा असलेले अत्याधुनिक रूग्णालय




आरामदायी, प्रशस्त, वातानूकुलित डिलक्स रूम





तीन स्वतंत्र लॅमिनार एअरफ्लो ऑपरेशन थिएटर..



अद्ययावत फिलिप्स अझ्युरियन कॅथलॅब एफ१७



अत्याधुनिक ४० बेड्स आय.सी.यु व वेंटीलेटर्स



अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅब



अत्याधुनिक सी.टी. स्कॅन मशीन






आय.सी.यु. मधील रूग्णांची २४ तास काळजी




२४ तास आपत्कालिन विभाग आणि डॉक्टर्स